I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 264-266 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article
OPEN ACCESS
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# कोविड – १९ चा असंगटित क्षेत्रातील कामगार वर्गावरझालेला परिणाम

डॉ.संजय मारोतराव महाजन

अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय, कुरखेडा

Communicated :20.02.2022 Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 Published: 30.03.2022

**सारांश :**

ऑगस्ट १९४७ मध्ये जन्माला आलेला भारत आजवर अनेक कठीण प्रसंगांना समोरा जात आलेला आहे. पण सध्याचा काळ आपल्या देशासाठी सर्वाधिक आव्हानात्मक काळ ठरू शकतो. याचे कारण, काविड–१९ या साथीच्या रोगाने देशासमोर अनेक आर्थिक संकटे निर्माण केली आहेत. शिक्षण, आरोग्य, वस्त्रोद्योग, विमानसेवा, पर्यअन, आणि आदरातिथ्य अशा रोजगार निर्मिती करणाऱ्या व्यवसायांचे या साथीने प्रचंड नुकसान केले आहे. इतकेच नव्हे तर या कोरोनाचा सर्वाधिक प्रभाव पडला असेल तर तो असंघटित क्षेत्रातील कामगारांवर देशातील अर्थव्यवस्थेचा कणा समजला जाणारा हा असंघटित वर्ग ज्या कामगारांच्या भरोवशावर उत्पादन घेतले जाते तो या लाटेमध्ये भरडून निघालेला दिसतो. कारखाण्यात काम करणारा मजूर, खाणीत काम करणारा कामगार, ढकलगाडीवर भाजीपाला मांडून दारोदारी फिरणारा भाजीपाला विक्रेता, घरोघरी भांडी– कपडे धुनी करणारी मोलकरीन, रस्त्याच्या कडेला आपली चहाची टपरी टाकून आपला उदरनिर्वाह करणारा चहा विक्रेता, शेतीवर काम करणारा शेतमजूर, वीट भट्टीवर काम करणारे मजूर, साफ–सफाई करणारा सपाई कामगार हे सगळे असंघटित मजूर, हे असंघटित मजूर हातावर आणुन पोटावर खाणारे, कुठलाही बॅक बॅलेन्स नाही, कुठलीही गुंतवणूक नाही, अशा या असंघटित मजूरांवर या माहामारीचां प्रभाव पडलेला दिसतो. आपल्या देशात ९० टक्के नोकऱ्या हया असंगटित क्षेत्रात आहे. रिक्षावाला, हातगाडीवाला, टॅक्सीवाले, रस्त्यावरचे खेळणी विक्रेते, चहाटपरी चाविणरे, गॅरेजवाले, बांधकाम क्षेत्रात काम करणारे कुशल व अकुशल कामगार अशा हातावर पोट असलेल्या लोकांच्या रोजगारावर कोरामुळे संकटे आली. कारोना येण्याच्या पूर्वी देशातील ७ टक्के असणारा बेकारीचा दर या महामाराच्या काळात २५ टक्क्यापर्यंत पोहचल्याचा अंदाज भारतीय अर्थव्यवस्था निरीक्षण केंद्राने (द सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनॉमी) वर्तवला आहे.

**बीजशब्द :** आदरातिथ्य, बॅलेन्स, गॅरेज, टॅक्सी, लॉकडाऊन, टाळेबंदी.

**प्रस्तावना :**

ऑगस्ट १९४७ मध्ये जन्माला आलेला भारत आजवर अनेक कठीण प्रसंगांना समोरा जात आलेला आहे देशाच्या फांळणीमुळे वाटयाला आलेल्या यातना, १९६० च्या दशकातील दुष्काळ व युध्दे, १९७० च्या दशकात इंदिरा गांधींनी लादलेली आणीबाणी आणि १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात व १९९० च्या दशकाच्या पूर्वाधात झालेल्या धार्मिक दंगली, हे सर्व इथे ज्ञानात घेतले पाहीजे. पण सध्याचा काळ आपल्या देशासाठी सर्वाधिक आव्हानात्मक काळ ठरू शकतो. याचे कारण, काविड–१९ या साथीच्या रोगाने देशासमोर अनेक आर्थिक संकटे निर्माण केली आहेत. शिक्षण, आरोग्य, वस्त्रोद्योग, विमानसेवा, पर्यअन, आणि आदरातिथ्य अशा रोजगार निर्मिती करणाऱ्या व्यवसायांचे या साथीने प्रचंड नुकसान केले आहे. इतकेच नव्हे तर या कोरोनाचा सर्वाधिक प्रभाव पडला असेल तर तो असंघटित क्षेत्रातील कामगारांवर देशातील अर्थव्यवस्थेचा कणा समजला जाणारा हा असंघटित वर्ग ज्या कामगारांच्या भरोवशावर उत्पादन घेतले जाते तो या लाटेमध्ये भरडून निघालेला दिसतो.कारखाण्यात काम करणारा मजूर, खाणीत काम करणारा कामगार, ढकलगाडीवर भाजीपाला मांडून दारोदारी फिरणारा भाजीपाला विक्रेता, घरोघरी भांडी– कपडे धुनी करणारी मोलकरीन, रस्त्याच्या कडेला आपली चहाची टपरी टाकून आपला उदरनिर्वाह करणारा चहा विक्रेता, शेतीवर काम करणारा शेतमजूर, वीट भट्टीवर काम करणारे मजूर, साफ–सफाई करणारा सपाई कामगार हे सगळे असंघटित मजूर, हे असंघटित मजूर हातावर आणुन पोटावर खाणारे, कुठलाही बॅक बॅलेन्स नाही, कुठलीही गुंतवणूक नाही, अशा या असंघटित मजूरांवर या माहामारीचां प्रभाव पडलेला दिसतो. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये कांविड–१९ चा असंघटित क्षेत्रावर पडलेल्या प्रभावाचे विवेचन करण्यात आले आहे.

**संशोधनाचे उद्देश :–**

१) कोविड–१९ मुळे मजूर वर्गावरझालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

२) असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

३) कोविड–१९ मुळे असंघटित क्षेत्रासमोर उद्भवलेल्या परिस्थितीचा अभ्यास करून उपाययोजना करणे.

**असंघटित कामगार म्हणजे काय?**

''आसंघटित कामगार म्हणजे जे कामगार सामायिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संघटित होऊ शकले नाहीत असे कामगार होय''.

भारतात वेगवेळया वेळी असंघटित कामगारांची संख्या किती आहे याबाबत निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही. साधारणत: असंघटित कामगारांमध्ये पुढील प्रकारच्या कामगारांचा समावेश होतो.

१) बांधकाम उद्योगातील कंत्राटदाराकडील कामगार.

२) तात्पुरता नैमित्तिक स्वरूपाचा रोजगार करणारा कामगार.

३) लघुउद्योगातील कामगार

४) हातमाग व यंत्रमागावर काम करणारे कामगार

५) विडी व सिगारेट उद्योगातील कामगार

६) दुकानामध्ये काम करणारे कामगार

७) स्वच्छता कामगार

८) इतर असंघटित कामगार

भारतातील असंघटित कामगारांच्या संख्येबाबत निश्चित स्वरूपाची आकडेवारी उपलब्ध नसली तरी, एकूण बिगरशेती क्षेत्रातील कामगारांच्या संख्येतून संघटित क्षेत्रातील म्हणजे नोंदणीकृत कारखाने, खाणी, मळे उद्योग, शासकीय व निम शासकीय संस्था, बंदरे, विमा कंपण्या, बॅका इत्यादीतील कामगारांची संख्या वगळता असंघटित कामगारांची संख्या मिळू शकते. हे सर्व कामगार आपले सामायिक हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी संघटित होऊ शकले नाहीत. आपल्या मालकवर्गाशी सामुहिकरित्या सौदा करू शकले नाहीत म्हणून या कामगारांना असंटित कामगार संबोधल्या जाते.

आपल्या देशात ९० टक्के नोकऱ्या हया असंगटित क्षेत्रात आहे. रिक्षावाला, हातगाडीवाला, टॅक्सीवाले, रस्त्यावरचे खेळणी विक्रेते, चहाटपरी चाविणरे, गॅरेजवाले, बांधकाम क्षेत्रात काम करणारे कुशल व अकुशल कामगार अशा हातावर पोट असलेल्या लोकांच्या रोजगारावर कोरामुळे संकटे आली. कारोना येण्याच्या पूर्वी देशातील ७ टक्के असणारा बेकारीचा दर या महामाराच्या काळात २५ टक्क्यापर्यंत पोहचल्याचा अंदाज भारतीय अर्थव्यवस्था निरीक्षण केंद्राने (द सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनॉमी) वर्तवला आहे.

चीनमधील वूहान शहरामधून आलेल्या कोरोना व्हायरसने हळूहळू संपूर्ण जग आपल्या कवेत घेतले. याच परिस्थितीतून भारतही जात आहे. अत्यंत संघर्षाच्या या काळात देश आणि देशवासीयांना प्रथम प्राधान्य देत अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशात लॉकडाऊन करत असल्याचे जाहीर केले. देशावर कोरोनाचे सावट असतांना परिस्थिती हाताबाहेर जाऊनये यासाठी मोदी सरकारकडून हा अत्यंत महत्वाचा निर्णय घेण्यात आला.पंतप्रधानांनी जनतेला कोणतीही पूर्व सूचना न देता भारत भर लॉकडाऊन ची घोषणा केल्यामुळे कामानिमित्य बाहेर राज्यात किंवा शहरात गेलेला स्थलांतरीत मजूर तिथेच अडकला. लॉकडाऊन मुळे सर्व उद्योग धंदे बंद झाल्यामुळे या मजूरांचे जगणे कठीण झाले.

देशातील प्रत्येक राज्यामध्ये अडकलेला हा स्थलांतरीत मजूर वर्ग या टाळेबंदीमुळे आपल्या स्वगावाकडे जाण्याच्या उत्सुकतेने जे साधन मिळेल त्या साधनाने तर कोणी पायदळ निघाले. गावाकडे जाण्याच्या लगभगीमुळे अनेक मजूरांना हाल अपेष्ठांना तोंड दयावे लागले. परंतू देशातील प्रत्येक राज्य सरकारने ज्या ठीकाणी थांबले आहेत त्याच ठिकाणी थांबण्याचे निर्देश दिल्यामुळे सर्व मजूर वर्ग तिथेच थांबले. त्यांच्या राहण्याची व खाण्या–पिण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी राज्यसरकारकडे सोपविण्यात आली. परंतूया असंख्य मजूरांची व्यवस्था करण्यात राज्यसरकारला अनेक अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे कुणावर उपासमारीची वेळ आली तर कुणाला आरोग्याच्या समस्येने ग्रासले नाईलाजास्तव हे त्रस्त झालेले मजूर पादळ स्वगावाकडे जाण्यासाठी निघाले. या स्थलांतरीत मजूरांचे लोंढेच्या लोंढे रस्त्याने दिसू लागले. कुणी पाचशे तर कुणी हजारो कीलो मीटर अंतर पायदळी तुडवून आपल्या स्वगावी पोहचले.

**बांधकाम क्षेत्रातील मजूर :–**

शहरी व ग्रामीण भागात स्त्रिया आणि पुरूष बांधकाम मजूर म्हणून काम करतात. कोरोनाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेमध्ये टाळेबंदी जाहीर करण्यात आली. त्यामुळे मोठ – मोठी बांधकामे ठप्प पडली. कारण बांधकामासाठी लागणारा कच्चा माल जसे, सिमेंट, रेटी, गिट्टी आणि लोहा इत्यादी कच्चा मालाची दुकाने बंद असल्यामुळे बांधकाम क्षेत्रातील सर्व कामे बंद पडली पर्यायाने बांधकाम क्षेत्रावर अवलांबून असणारा मजूर वर्ग बेकार झाला. आज टाळेबंदी उघडेल, उद्या उघडेल या आशेवर मजूर वर्ग विसंबून असून त्यांचा दोन वेळचा जेवणाचा प्रश्न आ वासून उभा आहे.

महाराष्ट्र सकारने १२ लाख नोदणीकृत बांधकाम मजूरांना प्रत्येकी १५०० रू. ची मदतीचा हात दिलेला आहे. लॉकडाऊन मुळे अनेकांची रोजी थांबणार असली वा मंदावली असली तरी कोणाची रोटी थांबू नये. उपासमार

होऊ याची काळजी सरकार घेत असली तरी ही मदतमात्र तुटपुंजी आह`असे म्हणावे लागेल.

**रिक्षा चालक :—**

कोरोनामुळे लॉकडाऊन जाहीर झाल्यामुळे प्रवासी वाहने मंदावली, रिक्षा चालकांचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण प्रवासी मिळत नसल्यामुळे रिक्षा चालविने परवडत नव्हते. कोणी रिक्षा जर बॅंकेचे लोन काढून घेतला असेल तर त्याची किस्त कशी भरावी हा प्रश्न निर्माण झाला. पर्यायाने त्यांना जीव कसा जगवावा हाच प्रश्न भेडसावित होता.

महाराष्ट्र सकारने १२ लाख परवानाधारक रिक्षाचालकांनाप्रत्येकी १५०० रूपयाची आर्थिक मदत देण्याची घोषणा केली. मात्र परवानाधारक रिक्षा चालक किती व बिगरपरवाना धारक रिक्षा चालक किती हाही प्रश्नच आहे.

**फेरीवाल्यांचा प्रश्न :—**

फेरीवाले म्हणजे हात ठेल्यावर भाजीपाला, फळे, किळकोर सामान विक्री करणारे. हातठेला किरायाने घेऊन भाजीपाला, फळे व किरकोळ माल ते गावा—गावात, वार्डात विकतात व आपली उपजीविका करतात. परंतू कोरोना काळात त्यांना फिरता येत नव्हते त्यामुळे त्याचाही उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाला.

महाराष्ट्र सकारने ५ लाख नोंदणीकृत फेरीवाल्यांना प्रत्येकी १५०० रू. अर्थसहाय्य देणार असून त्याची रक्कम बॅंक खात्यात जमा करणार आहे. परंतू नोंदणीकृत फेरीवाल्यांपेक्षा नोंदणी नसणारे फेरीवाले अधिक असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**मोलकरीनचा प्रश्न :—**

आज शहरात प्रत्येकाच्या घरी मोलकरी आहे. त्या आपला जीवन चरीतार्थ चालविण्याकरीता झोपडपट्टी मध्ये राहून इतरांच्या घरची भांडी, कपडे व फरशी वगैरे पुसतात. त्याबदल्यात त्यांना जी मजूरी मिळतात त्यात ते आपला प्रपंच चालवितात. मात्र कारोनामुळे अनेकांनी मोलकरीन बंद केलेल्या आहेत. कारण घरात बाहेरच्या व्यक्तिपासून कारोना रोखण्यासाठी त्यांनी मोलकरीन बंद केले असल्याचे दिसून आले. त्यामुळे अनेक मोलकरनचे काम बंद झाल्यामुळे आपण आपले कुटूंब कसे चालवावे हा प्रश्न पडलेला आहे.

**कारखाण्यातील मजूर :—**

शहारातील मोठ— मोठी कारखाने कंत्राटी व असंघटित मजूरांच्या भरोवशावर चालतात. परंतू कोरोनाच्या काळात अनेक कारखानदारांनी आपले उत्पादन कमी केल्यामुळे हया मजूरांना कामावर ठेवने कारखदारांना परवडत नव्हते. तसंच हया कामगारांच्या उपस्थितीवरही बंधने आली. पर्यायाने हया मजूरांना आपली रोजी रोटी गमावावी लागली.

**शेतमजूर :—**

ग्रामीण भागातील शेती हा लोकांना रोजगार पुरविणारा प्रमुख व्यवसाय आहेत. संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थाच शेतीवर अवलंबून आहे. काही मजूरांची शेती नसते. ते दुसऱ्यांच्या शेतीवर मजूरीने जावून आपली उपजीविका करतात. परंतू कोरोनाच्या काळात बऱ्याच शेतकऱ्यांनी आपल्या शेतावरील मजूर बंद केल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक शेतमजूरांना बेकारीचे जीवन जगावे लागले.

**चहाटपरी चालविणारे :—**

शहरात रस्त्याच्या कडेला अनेक चहाटपरी असतात. दिवसभर चहाटपरी चालवून ते`आपला चरीतार्थ चालवित असतात. परंतू कोरोनाच्या काळात हया चहाटपरी वाल्यांच्या व्यवसायावर पण गदा आली. त्यामुळे यांच्या समोर देखील उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला.

**दुकानातील नोकरवर्ग :—**

शहरात मोठ—मोठी दुकाने, मॉल असताता त्यात अनेक नोकरवर्ग हा ग्रामीण भागातून रोजी रोटी साठी शहरात आलेला असतो. तो किरायाच्या घरात राहून दुकानात नोकरी करतो. परंतू लॉकडाऊनमुळे दुकाने बंद असल्यामुळे त्यांची रोजी रोटी बंद झाली. पर्यायाने त्यांना जीवन कसे जगावे हा मोठा प्रश्न पडलेला आहे.

एकंदरीत हया असंघटित क्षेत्रातील मजूर वर्गावर या कोरोना महामारीचा गंभीर परिणाम झालेला दिसून येतो. म्हणून सरकारने हया असंघटित क्षेत्रातील मजूर वर्गाकरीता मोठया प्रमाणात आर्थिक सहाय्य देवून त्यांची आथिक स्थिती मजबूत करण्याच्या दृष्टीने उपाय योजना करने गरजेचे आहे.

**संदर्भ :**

महानुभव —लॉकडाऊन विशेषांक, समकालीन प्रकाशन,पुणे

कोरोनाचा असंटित मजूर वर्गावर झालेल्या परिणामांचे समाजशास्त्रीय अध्ययन— डॉ. रविंद्र विखार, अजंता जर्नल्स, जुन—२०२१

पवार प्रकाश (२०२०) कोविड १९ ची कथा नव्या कोविडोत्तर युगाची नांदी, मुराळी.

https://www.bbc.com/marathi/india-52097708

http://oldror.lbp.world/UploadedData/12265.pdf

https://www.orfonline.org/marathi/impact-of-covid-19-on-rural-lives-and-livelihoods-in-india-65101/